पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी पुणे -१८
माध्यमिक शिक्षण विभाग
एकत्रित मानधनावर सहाय्यक शिक्षक बी.एड.उर्तीर्ण परीक्षेतील गुणवत्तेनुसार नेमणूका करणेबाबत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष -२०२१-२०२२ करीता तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर मराठी व उर्दु माध्यमासाठी सहा.शिक्षकांची आवश्यकता आहे.त्याकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हताधारकांकडून समक्ष अर्ज मागवणेत येत आहेत.

मराठी माध्यम
आवश्यक पदे -८८

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | आवश्यक पदे |
|---|---|---|
| १ | बी.एस्सी.बी.एड. | ३६ |
| २ | बी.ए.बी.एड. –इंग्रजी | १० |
| ३ | बी.ए.बी.एड. –मराठी | १७ |
| ४ | बी.ए.बी.एड. –हिंदी | १० |
| ५ | बी.ए.बी.एड. –भुगोल | ०४ |
| ६ | बी.ए.बी.एड. –इतिहास | ०४ |
| ७ | बी.पी.एड. क्रीडा प्रशिक्षक | ०७ |

उर्दु माध्यम
आवश्यक पदे -२३

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | आवश्यक पदे |
|---|---|---|
| १ | बी.एस्सी.बी.एड. | ०९ |
| २ | बी.ए.बी.एड. –उर्दु भुगोल | ०७ |
| ३ | बी.ए.बी.एड. –इंग्रजी इतिहास | ०७ |

अटी व शर्ती

१) सदर पदाची निवड (सहा.शिक्षक) ही पुर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरूपाची आहे.उमेदवारास मनपा सेवेत राहण्याचा अधिकार सांगता येणार नाही.सदरची नेमणूक शैक्षणिक वर्ष -२०२१-२०२२ या करीता आवश्यकतेनुसार राहील.

२) एकत्रित मानधन शिक्षकांची नेमणूक ही आदेशाचे दिनांकापासुन सहा महीने राहील.

३) एकत्रित मानधन रक्कम रूपये १७,५००/- ( अक्षरी रक्कम रूपये - सतरा हजार पाचशे फक्त) एवढे राहील.उमेदवारांना शालेय सुट्टया वगळुन इतर सुट्टया देय राहणार नाहीत, दिवाळी व उन्हाळी सुट्टीचे वेतन देय असणार नाही.

४) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला,शैक्षणिक व व्यावसायिक अर्हताविषयक प्रमाणपत्र पदवीका बी.एड.पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक, जात प्रमाणपत्र, अनुभव दाखला इत्यादी कागदपत्राच्या सत्य प्रती सादर कराव्यात.

५) ज्या दिवशी माध्यमिक शिक्षण विभागास सदर सहा.शिक्षकांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय सदर उमेदवाराची सेवा संपुष्टात आणण्यात येईल या संबधीचे सर्व अधिकार माध्यमिक शिक्षण विभागाने राखुन ठेवले आहेत.

६) पात्र उमेदवारांना नेमणुका देताना आवश्यकतेनुसार शिक्षक संख्या कमी –जास्त करण्याचा अधिकार माध्यमिक शिक्षण विभागास राहील.

७) अर्जदाराने आपले अर्ज महापालिका जाहीरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील. मा.अति.आयुक्त (१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या नावाने करावा.सदरचा अर्ज घेउन बुधवार दि. ०८/०९/२०२१ रोजी समक्ष **माध्यमिक विद्यालय आकुर्डी, उर्दु जुना मुंबई पुणे रस्ता आकुर्डी पुणे – ३५** या ठिकाणी सकाळी १० ते सायंकाळी ०५ या वेळेत हजर रहावे.

अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राच्या पडताळणीसाठी मूळ कागदपत्रे नसतील अथवा विहित नमुन्यात नसेल तर आपला अर्ज बाद करण्यात येईल.

८) निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधनाव्यतिरीक्त कोणत्याही सोयी सुविधा,नोकरी विषयक हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही. (उदा.दिवाळी बोनस तथा सानुग्रह अनुदान)

९) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.निवडीच्या कोणत्याही टप्यावर अर्जदार विहित शैक्षणिक पात्रता धारण न करणारे ,तसेच नेमणूकी संदर्भात दबाव तत्रांचा वापर करणारे असल्यास उमेदवारी अथवा निवड पुर्व सुचना न देता रद्द करणेत येईल.

१०) मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

११) अपुर्ण अर्ज,अर्धवट कागदपत्रे जोडलेल्या तसेच जाहीरातीनुसार नमुद केलेली शैक्षणिक अर्हता धारण न केलेल्या उमेदवारांचे अर्ज बाद करून अपात्र ठरविले जातील,याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२) उर्दु माध्यमाचे सहा.शिक्षकांना मनपाच्या कोणत्याही विद्यालयात कामकाज करावे लागेल,तसेच बी.ए.बी.एड.शिक्षकांना गणित व विज्ञान विषय वगळुन इतर सर्व विषयांचे अध्यापनाचे कामकाज करावे लागेल.

१३) सदर पात्र उमेदवारांना माध्यमिक शिक्षण विभागाच्या आवश्यकतेनुसार व विद्यालये ऑफलाईन सुरू झाल्यानंतर नेमणूक आदेश दिले जातील.

१४) नियुक्तीच्या वेळी उमेदवारांना रक्कम रूपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर ( नोटराईज्ड करून) मनपा सेवेत भविष्यात नोकरी बाबतचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच न्यायालयात दाद मागणार नाही.याबाबतचे हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देणेत आलेला आहे.जाहीरातीनुसार कार्यवाही करणे अथवा प्रकीया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय मा.अतिरिक्त,आयुक्त (१) यांचा राहील.

सही/-
(विकास ढाकणे)
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे -१८

जाहीरात क्र.०१/२०२१
क्र.माध्य/शि/०१/कावि/६९३/२०२१
दि.३०/०८/२०२१

(संदिप खोत )
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी,पुणे -१८

## ऊमेदवाराने करावयाचा मराठी व ऊर्दु माध्यम अर्जाचा नमुना
## मराठी / ऊर्दु

प्रति,

मा.अतिरिक्त आयुक्त,(१)
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे -१८

| पासपोर्ट साईज फोटो |
|---|

विषय – सन २०२१ – २२ या शैक्षणिक वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर शिक्षक नेमणूकीबाबत........

संदर्भ – जाहीरात क्र. ०१ दि. ३० / ०८ /२०२१ प्रसिध्द झालेली जाहिरात

महोदय,

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीनुसार मी पिंपरी चिंचंवड महानगरपिलिकेच्या एकत्रित मानधनावर माध्यमिक शिक्षण विभागाकडील तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करावयाच्या सहा.शिक्षक या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

| | आडनाव | स्वत:चे नाव | वडिलांचे/पतीचे नाव |
|---|---|---|---|
| १) संपूर्ण नाव - | | | |

२) पत्रव्यवहाराचा पत्ता पिनकोडसह –

३) मोबाइल नंबर-

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

४) जन्मतारीख -

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

५) लिंग स्त्री / पुरुष

६) जात - प्रवर्ग –

जात पडताळणी आहे / नाही असल्यास क्रमाक व दिनांक ( सोबत छायाकिंत सत्यप्रत)

७) मुख्य विषय -

| | |
|---|---|
| १ - | २ - |

८) अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशिल –

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | माध्यम | विषय | | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | | | | |
| २ | एच.एस.सी. | | | | | | |
| ३ | बी.ए./बी,एस्सी | | | | | | |
| ४ | बी.एड. | | | | | | |
| ५ | बी.पी.एड | | | | | | |

- पर्सेंटाईल गुण असणा-या उमेदवारांनी संबंधीत विद्यापिठाची शेकडा गुणांची प्रमाणित प्रत जोडावी,सदर प्रत नसेल तर अर्ज बाद केला जाईल.
- शैक्षणिक अर्हतेत चुकीचा पर्याय खोडावा.
- गुणपत्रके व प्रमाणपत्रांची प्रत जोडावी.

वरील तक्त्यात नमूद केलेला तपशील खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करते/करतो की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे एकत्रित मानधन नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

आपला विश्वासु

स्वाक्षरी

स्थळ –

अर्जदाराचे नाव ( )

दिनांक - /०९/२०२१

टिप – आवश्यक कागदपत्राव्यतिरीक्त अनावश्यक कागदपत्रे जोडु नये.